**।। प्रेस नोट ।।**
विषय: जळगाव जिल्हा पोलीस शिपाई भरती २०२४-२५ – २२ फेब्रुवारी २०२६ (अंतिम दिवस) शारीरिक चाचणीचा अहवाल.
जळगाव:
जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई संवर्गातील रिक्त १७१ पदांच्या भरतीसाठी आयोजित करण्यात आलेली शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रिया आज, दिनांक २२/०२/२०२६ रोजी यशस्वीरीत्या संपन्न झाली। सन २०२४-२५ च्या या भरती प्रक्रियेसाठी अर्ज सादर केलेल्या महिला उमेदवारांची चाचणी दिनांक ११/०२/२०२६ पासून दररोज सकाळी ०५:०० वाजेपासून सुरू करण्यात आली होती।
आज भरती प्रक्रियेच्या शेवटच्या दिवशीची सांख्यिकी माहिती खालीलप्रमाणे आहे:
📍 पोलीस भरतीसाठी बोलावलेले एकूण उमेदवार: १७१८ (महिला उमेदवार)
📍 पोलीस भरतीसाठी प्रत्यक्षात हजर राहिलेले उमेदवार: १२२४
📍 शारीरिक मोजमापात अपात्र ठरलेले उमेदवार (वयोमर्यादिसह): १६९
📍 मैदानी चाचणीत अपात्र ठरलेले उमेदवार: ६८४
📍 मैदानी चाचणीत पात्र उमेदवार: ३७१
सदरची संपूर्ण भरती प्रक्रिया पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात आली। भरतीचा आज शेवटचा दिवस असल्याने पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त आणि चोख नियोजनासह ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.
7:04 pm